## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
## शुक्रवार दिनांक ०७/०३/२००३ रोजी झालेल्या ८७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ८७ वी बैठक शुक्रवार दि.०७/०३/२००३ रोजी दुपारी ४.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर | सभापती |
| २. | श्री.सुरेश कारंडे | मुख्य अधिकारी |
| ३. | मा.श्री.सचिन मा.सावंत | सदस्य |
| ४. | मा.श्री.विश्वास मोकाशी, | सदस्य |
| ५. | मा.श्री.गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ६. | मा. श्री. रघुनाथ थवई | सदस्य |
| ७. | मा. श्रीमती छाया कल्याणी | सदस्या |
| ८. | मा. श्री. रमेश परब | सदस्य |
| ९. | मा.श्री.मोहन देसाई | सदस्य |
| १०. | मा. श्री. बाप्पा सावंत | सदस्य |
| ११. | मा. श्री. अबुबकर मुसा बाटलीवाला | सदस्य |
| १२. | प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनीधी | निमंत्रक |
| १३. | उपकर निर्धारक व संकलक हयांचे प्रतिनिधी | निमंत्रक |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव हयांनी असे सांगितले की, मा. उपसचिव, म.शा. हे कार्यालयीन कामानिमित्त दिल्ली येथे गेले असल्याने ते आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याचा संदेश फॅक्सव्दारे त्यांच्या स्विय सहाय्यकांनी पाठविला आहे.

तद्नंतर मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी हयांनी सभागृहाच्या असे सांगितले की,, सन्मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट व श्री. उस्मान गणी कुरेशी (लालीभाई) हे पक्षकार्यामुळे आजच्या बैठकीस उपस्थित राहणार नाहीत तसेच मा.सदस्य श्री. संजय शिर्के हे त्यांचे नातलग आजारी असल्याने आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नाहीत.

तदनंतर मा. सभापती हयांनी बैठकीस सुरुवात करण्याच्या सूचना सचिवांना दिल्या.

---

**बाब क्रमांक : ८७/१**

विषय- **दि. ०७.०२.२००३ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ८७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.**

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ६१ वर सादर करण्यात आला आहे.

हया कार्यवृत्तांच्या अनुषंगाने मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी हयांनी असे प्रतिपादन केले की, त्यांनी मागील बैठकीत सांगितल्यानुसार काही उपकप्राप्त इमारतींवर मोबाईल कंपन्यांनी त्यांची मोठमोठी उपकरणे मंडळाची परवानगी न घेता बसविली आहेत. अशा उपकरणांसाठी म.न.पा. व इमारत मालकांना आर्थिक उत्पन्न होत असते. मात्र अशी इमारत जर पडली तर त्यास मंडळास जबाबदार धरले जाते. त्यामुळे हयाबाबत मंडळ काय निर्णय घेणार आहे? अशी विचारणा मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी हयांनी केली.

मा. सदस्य श्री.विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे सुचविले की, ज्या ज्या उपकरप्राप्त इमारतींवर मोबाईल कंपन्यांची उपकरणे बसविली आहेत अशा इमारतींची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावी जेणेकरुन त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेता येईल. मा. सभापती हयांनी असे सुचविले की, मा. सदस्य श्री.विश्वास मोकाशी हयांनी सुचविलेल्या माहिती बरोबरच ज्या ज्या इमारतींवर फलक (होर्डीग्ज) लावण्यात आले आहेत अशाही इमारतींची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्यात यावी.

तद्नंतर मा. सभापती हयांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणले की, मागील २-३ वर्षांपासून रहिवाशांच्या हिताच्या दृष्टीने आपण काम करीत असताना काही प्रकरणी वादविवाद निर्माण झाले. मा. सभापती हया नात्याने व मा. सदस्य हया नात्याने आपण सर्वांनी हया वादविवादास समर्थपणे तोंड दिलेले आहे. पिंपळवाडी, गिरगाव येथील पुर्नविकास योजना ही बरीच वर्षे रखडल्याने आपण रहिवाशांच्या हिताच्या दृष्टीने सदर पुर्नविकास योजनेस मंडळाने ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्यानंतर त्यास मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन आव्हान देण्यात आले होते. हया याचिकेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने निर्णय देताना मा. सभापती हया नात्याने त्यांच्यावर त्याचप्रमाणे तत्कालीन उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. खोब्रागडे साहेब व तत्कालीन मुख्य अधिकारी श्रीमती वंदना खुल्लर हयांच्याविरुध्द मा. उच्च न्यायालयाने ताशेरे ओढले होते. मा. उच्च न्यायालयाच्या हया आदेशाविरुध्द त्यांनी स्वतः, तत्कालीन उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. तसेच काही रहिवाशांनी मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने आज दि. ७.३.२००३ रोजी अंतिम आदेश दिले असून हया आदेशांनुसार मा. उच्च न्यायालयाने त्यांच्यावर तसेच तत्कालीन मुख्य अधिकारी व तत्कालीन उपाध्यक्ष व मु का.अ./प्रा. हयांच्यावर केलेले आरोप मा. सर्वोच्च न्यायालयाने काढून टाकले आहेत व मंडळाने पूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार ही पुर्नविकास योजना रहिवाशांच्या विकासकामार्फत प्राधिकरणाने राबवावी असे आदेश दिले आहेत. हया कामी सन्मा. सदस्य तसेच मंडळाच्या अधिका-यांनी सहकार्य दिल्याबद्दल मा. सभापती हयांनी त्यांचे आभार मानले.

तद्नंतर मा. सभापती, तत्कालीन उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. खोब्रागडे साहेब व तत्कालीन मुख्य अधिकारी श्रीमती वंदना खुल्लर हयांच्यावर मा. उच्च न्यायालयाने केलेले आरोप मा. सर्वोच्च न्यायालयाने काढून टाकल्यामुळे सचिव हयांनी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव सभागृहापुढे सादर केला व त्या अनुषंगाने सर्व सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारीवर्गाने टाळया वाजवून मा. सभापती, तत्कालीन उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. खोब्रागडे साहेब व तत्कालीन मुख्य अधिकारी श्रीमती वंदना खुल्लर हयांचे अभिनंदन केले.

सविस्तर चर्चेअंती मंडळाच्या दि. ०७.०३.२००३ रोजी संपन्न झालेल्या ८७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

------------ooo----------

४

**का.अ. (स.सं.कक्ष)**

**बाब क्रमांक : ८७/२**

विषय- तेजुकाया मॅन्शन क्र.३, इ.क्र.४२४, डॉ. आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई-१२,येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित शरिन मेन्शन स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र. ६३ ते ६७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने का.अ. (स.सं.कक्ष)हयांनी असे प्रतिपादन केले की, ही इमारत तळ अ १ मजल्याची असून एकुण ३९ रहीवाशांपैकी ३३ रहिवाशांनी हया प्रस्तावास संमती दिलेली असून सदर प्रस्ताव शासनाकडे भूसंपादनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यास हरकत नसावी.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तद्नुषंगाने अशी विचारणा केली की, प्रस्तावातील अनु.क्र.८ मध्ये नमूद केल्यानुसार पुर्नविकासामुळे मूळ भाडेकरुंना सामाऊन घेतल्यानंतर मंडळास उपलब्ध होणारे अतिरिक्त गाळे "निरंक" दाखविण्यात आले आहेत. हयाचा अर्थ काय आहे ? का.अ. (स.सं.कक्ष) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीचा पुर्नविकास केल्यानंतर म्हाड अधिनियम १९७६ च्या परिशिष्ट ३ नुसार अतिरिक्त उपलब्ध होणारे क्षेत्रफळ हे ५० टक्क्यापेक्षा कमी आहे व त्यामुळे मंडळास अतिरिक्त गाळे उपलब्ध होण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याने ते निरंक दाखविण्यात अले आहेत.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत आपण आंबेवाडी स.गृ.नि.संस्थेच्या प्रस्तावास मंजूरी दिली होती. तदनंतर रहिवाशांनी मंडळाकडे ३० टक्के अनामत रक्कमेचाही भरणा केला आहे. परंतु सदर प्रस्ताव अद्याप शासनाकडे मंजूरीसाठी सादर केलेला नाही. हया प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी केली.

का.अ. (स.सं.कक्ष) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, रहिवाशांनी धनादेशाव्दारे अनामत रक्कम मंडळाकडे भरली असून सदर रक्कम स्विकृत करण्यात आली आहे व रहिवाशांना तसे कळविण्यात आले आहे. धनादेश वटल्यानंतर प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला जाईल.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित रहिवाशांबरोबर त्यांनी बैठक घेतली होती. हया प्रस्तावामध्ये ज्या काही अडचणी होत्या त्या आता सोडविण्यात आल्या आहेत व रहिवाशांनी आता अनामत रक्कम मंडळाकडे जमा केली आहे.

पूर्तता
का.अ./स.सं.क

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे आदेश दिले की, आंबेवाडी स.गृ.नि.संस्थेचा प्रस्ताव मंगळवारपर्यंत (दि.११.३.२००३ अखेर) शासनास सादर करावा.

वरील सविस्तर चर्चेअंती विषयांकित प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८७/६७७**

**तेजुकाया मॅन्शन क्र.३, इ.क्र.४२४, डॉ. आंबेडकर मार्ग, लालबाग, मुंबई-१२,येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित शरिन मेन्शन स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.**

**बाब क्रमांक : ८७/३ (अ)**

६

विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.
(दि. १.२.२००३ ते २८.२.२००३)

------------

सदर माहिती पृ.क्र.६९ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, एलफिन्स्टन रोड येथील परमानंद कुंभार चाळीत एका खोलीचे छत (स्लॅब) कोसळून अपघात झाला होता. मात्र हया अपघाताची कल्पना मंडळाच्या नियंत्रण कक्षास तसेच त्यांनाही देण्यात आली नाही. अपघातानंतर त्याची माहिती मंडळाच्या नियंत्रण कक्षास त्वरित प्राप्त होण्याच्या दृष्टीने रहिवाशांना त्याबाबत जागरुक करणे आवश्यक आहे असे वाटते.

सचिव हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, दरवर्षी आपण पावसाळापूर्व सर्वेक्षणा अगोदर वर्तमानपत्रामध्ये जाहीर निवेदन प्रसिध्द करुन उपकरप्राप्त इमारतींच्या अपघाताची माहिती मंडळाच्या नियंत्रण कक्षात देण्याबाबत रहिवाशांना विनंती केली जाते.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण हयाबाबत एक नमुना पत्र नुकतेच तयार केले असून सदर पत्र मुंबई शहरातील सर्व मा. खासदार, आमदार, नगरसेवक इ. मान्यवर व्यक्तींना पाठवून त्यांना विनंती केली जाणार आहे की, त्यांच्या विभागातील धोकादायक इमारतींची तसेच अपघातांची मंडळाच्या संबंधित कार्यालयास व नियंत्रण कक्षास देण्यात यावी तसेच पावसाळयापूर्वी आपण दूरदर्शनवरही त्याबाबत कार्यक्रम प्रसारित करुन रहिवाशांना जागरुक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत असतो. रहिवाशांना जागरुक करण्याच्या दृष्टीने वेळोवेळी मंडळाकडून प्रयत्न केले जातात.

तदनंतर मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत ठरल्यानुसार त्यांनी व मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी इ.क्र.७५-७७, खेतवाडी मेन रोड हया इमारतीची पाहणी केली. हया पाहणीत सदर इमारत अतिशय धोकादायक अवस्थेत असल्याचे आढळून आले. ही इमारत केव्हाही पडू शकते. हया इमारतीतील दोन रहिवाशी त्यांचे गाळे खाली करण्यास तयार नाहीत. हया परिस्थितीत ही इमारत त्वरित खाली करुन घेणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींचे पावसाळापूर्व सर्वेक्षण मार्च महिन्याअखेर पूर्ण करण्याचा अतिशय चांगला निर्णय घेतला आहे. ज्यामुळे हया सर्वेक्षणात आढळणा-या धोकादायक इमारतींबाबत जूनपर्यंत योग्य ती कार्यवाही/खबरदारीच्या उपाययोजना करण्यास अवधी मिळणार आहे. असे असताना ही खेतवाडीतील इमारत जर अतिशय धोकादायक आहे तर ती त्वरित खाली करुन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

| पूर्तता<br>का.अ./डी-२ |
|---|

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने कार्यकारी अभियंता/डी-२ विभाग हयांना सदर इमारत हया महिन्याअखेर पर्यंत खाली करण्याचे आदेश दिले.

----------०O०---------

e

**बाब क्रमांक : ८७.३ (ब)**

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती
कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना
प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

दक्षिण परिमंडळातील एकूण ९ इमारतींच्या दुरुस्ती कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव पृ.क्र. ७१ ते ८९ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील **ए.** विभागातील २, **बी** विभागातील ५, **सी-३-४** विभागातील १ व **डी-१** विभागातील १, अशा एकूण ९ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

याशिवाय आयत्यावेळच्या विषयात मा. अध्यक्षांच्या परवानगीने दक्षिण परिमंडळातील ११ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

मा. सभापती हयांनी सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आतापर्यंत मंडळाच्या बैठकीपुढे दुरुस्तीचे जे प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केले गेले त्यावर प्रस्तावनिहाय चर्चा न करता अधिका-यांवर विश्वास ठेऊन त्यांना मंजूरी देण्यात आली आहे. मात्र असे निदर्शनास आले आहे की, प्रशासकीय मंजूरी प्रदान केल्यानंतर मंजूर रक्कमेचा उपभोग घेतला जात नाही. काही इमारतींची दुरुस्तीची कार्यवाही सुरु केलेली नसते वा दुरुस्ती सुरु झाल्यानंतर तसेच काम बंद पडते किंवा दुरुस्ती कामाच्या निविदा मागविल्या जात नाहीत. प्रशासकीय मंजूरी दिल्यानंतर वास्तविक दुरुस्ती कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. दोन-तीन इमारतींच्या दुरुस्ती प्रकरणांमध्ये असे निदर्शनास आले आहे की, इमारत मालकांमुळे दुरुस्तीची कामे सुरु करण्यात आलेली नाहीत. काही इमारतींच्या दुरुस्तीसाठी आपण ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर दुरुस्तीची कामे रखडलेली आहेत. त्यामुळे अशा दुरुस्तीच्या कामांमध्ये तगादा लावून दुरुस्तीची कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने योग्य ती काळजी वेळोवेळी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे मा. सभापती हयांनी अशी विनंती केली की, दुरुस्ती कामास प्रशासकीय मंजूरी प्रदान केल्यानंतर कालबध्द कार्यक्रम आखून विहित कालावधीमध्ये निविदा मागवून ठेकेदाराची नेमणूक करणे, काम सुरु करुन ते विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने काळजी घेण्यात यावी.

झांसी बिल्डिंगच्या दुरुस्तीबाबत असा प्रकार घडला असून आयत्या वेळच्या विषयात दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी दिली होती. तद्नंतर इमारत धोकादायक असल्याने रहिवाशांच्या मागणीनुसार हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तदनंतर इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरुही करण्यात आले होते परंतु तद्नंतर इमारत मालकाने ही इमारत स्वखर्चाने दुरुस्ती करण्याची तयारी दर्शविल्याने दुरुस्ती काम उपमुख्य अभियंता (द.) यांनी थांबविले.

उपमुख्य अभियंता (द.) हयांच्या स्वीय सहायकांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया दुरुस्ती कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असून निविदा स्विकृतही करण्यात आल्या आहेत. ठेकेदाराबरोबर करारपत्र करण्याची कार्यवाही चालू आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी इमारत मालकाने पत्र देऊन ना.ह.प्र.पत्राची मागणी केली असल्याने दुरुस्तीचे काम थांबले आहे अशी रहिवाशांनी तक्रार केली आहे. हयाबाबत मा. सभापती हयांनी अशी विनंती केली की, इमारत मालकाच्या ना.ह.प्र. पत्राच्या मागणीचा विचार न करता दुरुस्तीची पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

पुर्तता उमुअ (द.)

तद्नंतर मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने दक्षिण परिमंडळातील ज्या दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी दिल्यानंतर निविदा मागवून ठेकेदारांच्या नियुक्त्या केल्या आहेत. मात्र नियुक्त केलेल्या ठेकेदारांनी त्यांची मंजूर निविदा अधिक्य कमी असल्याने इमारत धोकादायक असूनही दुरुस्ती कामास सुरुवात केली नसल्याचे समजले. त्यामुळे मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी अशी विनंती केली की, जर ठेकेदार दुरुस्ती कामास सुरुवात करीत नसतील तर इमारतींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आपण योग्य निर्णय घेऊन पुढील कार्यवाही तात्काळ करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे सुचविले की, मागील ६ महिन्यांत मंडळाने ज्या इमारतींच्या दुरुस्ती कामांना प्रशासकीय मंजूरी दिली आहे त्या इमारतींच्या दुरुस्ती बाबतची सद्यःस्थिती मंडळाच्या बैठकीपुढे सादर करण्यात यावी जेणेकरुन त्याबाबत चर्चा करणे शक्य होईल. तदनुसार मा. सभापती हयांनी हयाबाबतची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या.

पूर्तता उ.मु.अ. (द./उ.)

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण २० इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८७/६७८**

**दक्षिण परिमंडळातील एकूण २० इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-अ" प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

----------ooo-----------

**बाब क्रमांक : ८७.४**

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या
मुळ /सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी
प्रदान करणेबाबत.

-----------------------------

उत्तर परिमंडळातील १२ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी पृ.क्र. ९१ ते ११३ वर सादर करण्यात आली आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई विभागातील ६, फग/द विभागातील १ व फग/ऊ विभागातील ४ अशी एकूण १२ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. तसेच मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयामध्ये उत्तर परिमंडळातील ३ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील एकूण १५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८७/६७९**

**उत्तर परिमंडळातील एकूण १५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-ब" नुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

---------------oooo-----------------

**बाब क्रमांक : ८७.५**

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने ठेवावयाचे आयत्यावेळचे विषय**

---

१) विषय- इ.क्र.७-९-११, २४डी, फितवाला रोडच्या पुनर्रचनेबाबत.
--- जोत्यावरील बांधकाम.

......................

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता,(पुनर्रचना) हयांनी असे प्रतिपादन केले की, सदर इमारत ही एलफिन्स्टन रोड येथे फग/द विभागात येते. हे काम जोत्यावरील असून जून्या इमारतीतील सर्व रहिवाशी सद्यः मंडळाच्या संक्रमण शिबीरात रहात आहेत. ही पुनर्रचना योजना दोन विभागामध्ये राबविण्यात येत आहे. हया इमारतीच्या पाईल फाऊंडेशनचे काम स्वतंत्ररित्या पूर्ण करुन घेण्यात आले आहे. हया योजनेसाठी सुरुवातीला आपण वास्तुशास्त्रज्ञ म्हणून श्री. विजय कबरे हयांची नियुक्ती करण्यात आली होती. पाईल फाऊंडेशनचे काम पूर्ण करुन घेतल्यानंतर जोत्यावरील बांधकामासाठीचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक मंजूरी घेण्यात आली व तद्नंतर जोत्यावरील बांधकामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या व निम्नतम निविदाधारक मे. आर.एस. गुप्ता आणि कं. हयांना हे जोत्यावरील बांधकामाचे कंत्राट ११ टक्के जादा दराने निविदा मंजूर करुन देण्यात आले होते. हा ठेकेदार प्लिंथचे काम करीत असताना वास्तुशास्त्रज्ञ व त्यांचे आर.सी.सी. कन्सलन्टट हयांनी, सदर ठेकेदार भारतीय मानकांनुसार काम करीत नाही, त्याला देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करीत नाही, त्याला पत्र पाठविण्यात आल्यानंतर तो पत्र स्विकारीत नाही, अशा तक्रारी वारंवार केल्या होत्या. तदनंतर का.अ. (पु.वि.३) व त्यावेळचे उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी त्यांच्या स्तरावरही सदर ठेकेदारास वरील तक्रारीबाबत कल्पना दिली होती. तसेच वास्तुशास्त्रज्ञ व आर.सी.सी. कन्सलटन्ट हयांनी सूचविल्यानुसार हया ठेकेदाराने जे कॉलमस् बांधले होते ते तोडणे आवश्यक होते. सदर कॉलमस् तोडण्याबाबत हया ठेकेदारास वारंवार सांगूनही त्याने कॉलमस तोडले नाहीत. हयाबात ठेकेदारास वारंवार पत्र पाठवून सूचना दिल्या होत्या तसेच निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबत करारपत्राच्या कलम १७ नुसारही नोटीस देण्यात आली होती. त्याला हयाबाबत दंड का आकारु नये अशीही नोटीस देण्यात आली होती. हे काम यशस्वीरित्या पुन्हा सुरु करुन लवकरात लवकर पूर्ण व्हावे हयादृष्टीने तसेच सदर ठेकेदार आज ना उद्या हे काम पुन्हा सुरु करुन लवकर पूर्ण् करेल व निकृष्ट दर्जाचे काम

सदर ठेकेदार तोडेल अशी त्यावेळी मंडळाची भूमिका होती. उपमुख्य अभियंता (पुनर्र) हया पदाचा कार्यभार डिसेंबर-२००२ मध्ये स्विकारल्यानंतर हया कामाची पाहणी केल्यानंतर सकृतदर्शनी झालेले काम हे निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळले. दरम्यानच्या कालावधीत हया योजनेचे वास्तुशास्त्रज्ञ श्री. कबरे हयांनी सदर ठेकेदार त्यांच्या सूचनांचे पालन करीत नाही म्हणून राजीनाम दिला तसेच आर.सी.सी. कन्सलटन्टट हयांनीही विविध कारणे नमूद करुन राजीनामा दिला. ही बाब मुख्य अभियंता हयांच्या नजरेस आणून नवीन वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करण्यात आली. नवीन वास्तुशास्त्रज्ञांनी त्यांचा आर.सी.सी. कन्सलटन्टट म्हणून श्री. जैन हयांची नियुक्ती केली. नवीन वास्तुशास्त्रज्ञ व त्यांचे आर.सी.सी. कन्सलटन्टट हयांनी हया कामाची पाहणी केल्यानंतर त्यांनीही झालेले काम निष्कृष्ट असल्याने तोडणे आवश्यक असल्याचे कळविले. तद्नंतर सदर ठेकेदाराबरोबर बैठक घेऊन त्याला संगण्यात आले की, जूने,नवीन वास्तुशास्त्रज्ञ व त्यांचे आर.सी.सी. कन्सलटन्टट तसेच मंडळाच्या अधिका-यांच्या मतांनुसार त्याने केलेले बांधकाम निष्कृष्ट असल्याने तोडणे अनिवार्य आहे व त्यामुळे हे काम त्वरित तोडण्याबाबत त्याला विनंती केल्यानंतर त्याने केलेले बांधकाम मंदगतीने तोडण्यास सुरुवात केली. हे सर्व करीत असताना जवळजवळ एक ते सव्वा वर्षांचा कालावधी संपून गेला. तद्नंतर सदर ठेकेदाराने तळ मजल्याचे नवीन कॉलम बांधले पाईल फाऊंडेशनचे जे काम करण्यात आले होते त्यामध्ये व सेंटर लाईनमध्ये थोडाफार फरक पडल्याने आर.सी.सी. कन्सलटन्टनी सुचविल्यानुसार इमारतीवर येणारा भार लक्षात घेऊन तळ मजल्यावरील कलमाच्य आकारात वाढ करण्यात आली होती. तळ मजल्याच्या छताचे बांधकाम साधारणतः २५.०९.२००२ रोजी करण्यात आले व तद्नंतर कार्यकारी अभियंता हयंनी वरील मजल्यांच्या बांधकामाचे नकाशे सदर ठेकेदारास देऊन काम करण्याच्या सूचना दिल्या. परंतु ठेकेदाराने पहिल्या मजल्याचे निम्मे कॉलमस् बांधून दि. १०.१०२००२ पासून उर्वरित काम बंद केले. हयाबाबत ठेकदारास का.अ. हयांनी पत्रे पाठवू काम सुरु करण्याच्य नाटीसा देण्यत आल्या. हया नोटीसांच्या उत्तरादाखल सदर ठेकेदाराने असे कळविले की, तळ मजल्याच्या कॉलमस्च्या आकारमानात वाढ केलेली असताना वरील मजल्यांच्या कॉलमस्च्या आकारमानात वाढ केली नसल्याने त्याने काम बंद केले आहे. हयाबाबत आर.सी.सी. कन्सलटन्ट यांनी सदर ठेकेदारास असे कळविले की, तळ मजल्याच्या कॉलमस्च्या आकरमानात वाढ करण्याची कारणे भिन्न असून इमारतीवर येणारा भार लक्षात घेऊन वरील मजल्यांच्या कॉलमस्च्या आकारमानात वाढ करण्याची आवश्यकता नसून दिलेले आकारमान योग्य असल्याने त्यानुसार काम करावे. का.अ. (पु.वि.३) हयांनीही हयाबाबत सदर ठेकेदारास पत्र पाठवून काम सुरु करण्याच्या सूचना दिल्या. तदनंतरही सदर ठेकेदाराने अद्याप काम सुरु केलेले नाही. मध्यंतरीच्या कालावधीत हया इमारतीतील रहिवाशांनी अशी तक्रार केली आहे की, दोन वर्षांचा कालावधी होऊनही त्यांच्या इमारतीच्या पुनर्रचनेचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. मात्र त्यांच्या इमारतींबरोबर सुरु करण्यात आलेल्या इतर इमारतींच्या पुनर्रचनेची कामे पूर्ण होत आहेत. त्यामुळे रहिवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सूचना दिल्यानुसर का.अ हयांनी ठेकेदारास विलंबासाठी रु. १०००/- प्रति दिन दंड आकारला असून तदनंतर तो रु. ५०००/- प्रतिदिन इतका वाढवला आहे. मध्यंतरीच्या काळात त्या विभागातील मा. आमदारांनी हयाबात मुख्य अधिकारी, दु.व पु.मंडळ हयांचेसोबत बैठक घेतली होती. हया बैठकीमध्ये रहिवाशांनी अशी विनंती केली आहे की, सदर ठेकेदार काम पूर्ण करेल किंवा नाही हयाची शाश्वती नसल्याने तसेच त्याच्या कामाचा दर्जा चांगला नसल्याने त्याच्याकडून हे काम काढून घेऊन ते अन्य ठेकेदारास द्यावे. त्यानुसार मुख्य अधिकारी यांनी तोंडी आदेश दिले की, करारपत्राच्या अधिन राहून सदर ठेकेदारावर कारवाई करुन त्याच्याकडून हे काम काढून घ्यावे व दुस-या ठेकेदाराची नेमणूक करुन कामास सुरुवात करावी. रु. ५०००/- प्रतिदिन दंड आकारल्यानंतरही ठेकेदाराने काम

सुरु न केल्याने पुन्हा करारपत्राच्या कलम २ नुसार रु.१०,०००/- प्रतिदिन दंड आकारण्यत आला. तदनंतर ठेकेदारान त्याने केलेल्या कामाची रक्कम अदा करण्याची मागाणी केली. तदनुषंगाने वास्तुशास्त्रज्ञांनी सदर ठेकेदाराला असे कळविले की, कामाच्या ठिकाण बंधकाम सहित्य अशा त-हेने विखरुन ठेवण्यात आले आहे की, केलेल्या कामाचे मोजमाप घेणे अशक्य आहे. सदर ठेकेदाराने आवश्यक असताना त्याचा अभियंता वर्ग सुरुवातीपासून नेमलेला नाही. हयामुळे वास्तुशास्त्रज्ञांना ठेकेदाराने केलेल्या कामाचे देयक तयार करण्यास विलंब होत आहे. तदनंतर वास्तुशास्त्रज्ञांनी देयक तयार करुन सादर केले. परंतु अनेकवेळा सांगूनही सदर ठेकेदाराने काम पुन्हा सुरु न केल्याने का.अ. हयांनी करारपत्राच्या कलम ३ नुसार सदर ठेकेदारास नोटीस देऊन असे कळलि की, हया कामातून त्यांची मुक्तता का करण्यात येऊ नये? सदर नोटीसच्या अनुषंगाने ठेकेदाराने असे कळविले की, त्याने केलेल्या कामाची रक्कम त्याला दिली नाही तसेच सुरुवातीपासून कॉलमसच्या आकारमानात फेरबदल केल्याने त्यांनी उर्वरित काम सुरु केलेले नाही. ठेकेदाराचे हे स्पष्टीकरण मान्य करता येण्यासारखे नसल्याने का.अ. हयांनी सदर ठेकेदारास कळविले. ठेकेदाराला नोटीस पाठवून २०-२५ दिवसांचा कालावधी संपून गेल्यानंतर का.अ. यांनी ठेकेदारास करारपत्राच्या कलम ३ (सी) नुसार नोटीस देऊन असे कळलि की, उर्वरित काम हे त्याच्या जबादारीवर व त्याच्या पैशाने अन्य ठेकेदाराडून केले जाणार आहे, दरम्यानच्या कालावधीत ठेकेदाराची काम करण्याची मुदतही संपून गेली हेती. त्यामुळे हया सर्व बाबींची घटनाक्रमानुसार माहिती तयार करुन ठेकेदाराविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यासठी व करारपत्र चालू राहण्यासठी मुदतवाढ देण्याचा सविस्तर प्रस्ताव मुख्य अभियंता हयांना सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता हयांनी अशा सूचना दिल्या की, हया प्रकरणी फारच उशीर झाला असल्याने सविस्तर प्रस्ताव मंडळाच्या बैठकीसमोर सादर करुन सदर ठेकेदाराविरुध्द निर्णय घेऊन कार्यवाही करावी. तद्नुसार ठेकेदारास अंतिम नोटीस देऊन हा प्रस्ताव मुख्य अधिकारी व मुख्य अभियंता हयांच्या मार्फत मंडळापुढे सादर केला आहे. हया प्रस्तावानुसार खालील बाबी मंजूरीसाठी सादर केल्या आहेत.

१) ठेकेदार मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हयांचा करारनामा रद्द करुन करानाम्यातील कलम ३ (सी) नुसार उर्वरित काम, अल्प मुदतीची निविदा मागवू अन्य ठेकेदाराची नियुक्ती करुन करण्यात यावे,

२) मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हया ठेकेदाराची कोणत्याही कामांची देयके अदा करु नयेत, जेणेकरुन हया इमारतीच्या पुनर्रचनेचे काम त्यांच्या जबाबदारीवर व त्यांच्या पैशाने अन्य ठेकेदाराकडून करणे शक्य होईल,

३) मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हयांची ठेकेदार म्हणून झालेली नोंदणी रद्द करुन त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात यावे,

४) नोंदणी रद्द करेपर्यंत दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी करारपत्राची मुदत नोंदणी रद्द करण्याच्या सूचनेच्या तारखेपर्यंत वाढवून द्यावी.

मध्यंतरीच्या काळात मा. सभापती व इमारतीतील रहिवाशांची याबाबत बैठक झाली असून मा. सभापती महोदयांनी हया कामाची पाहणी देखील केली आहे. हया कामाबाबत रहिवाशी त्रस्त झाले असून काम सुरु करण्याचे मंडळाने केलेले सर्व प्रयत्न निष्फळ झाले आहेत. त्यामुळे रहिवाशांना लवकरात लवकर नवीन घरे देण्याच्या दृष्टीने सर्व उपाय संपले असल्याने वरील प्रस्ताव मंडळापुढे विचारार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत मा. सदस्य, श्री. सचिन सावंत हयांनी अशी विचारणा केली की, आपण वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यास सदर ठेकेदार न्यायालयात याचिका दाखल करु शकतो का? तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, तत्कालिन मुख्य अधिकारी हयांनी विधी सल्लागार/प्रा. हयांना हया ठेकेदाराविरुध्द मा. न्यायालयाने कॅव्हेट दाखल करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी त्यांनी स्वतः व का.अ. हयांनी विधी सल्लागार/प्रा. हयांची तद्नुषंगाने भेट घेतली होती. त्यावेळी विधी सल्लागार/प्रा. हयांनी असे सांगितले की, ठेकेदाराच्या विरुध्दच्या प्रस्तावास मंडळाने मान्यता दिल्यानंतर ते हया ठेकेदाराविरुध्द मा. न्यायालयात कॅव्हेट दाखल करतील.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्यावेळी हयाबाबत रहिवाशांबरोबर बैठक घेण्यात आली होती त्यावेळीही हा प्रश्न उपस्थित झाल होता. हया इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामास फारच विलब झाला असल्याने रहिवाशांमध्ये असंतोष पसरणे स्वाभाविक आहे. हयामुळे हया इमारतीच्या परिसरातील इत्तर इमारतींबाबतचही रहिवाशी मंडळामार्फत पुनर्रचना योजना राबविण्यास नाखुष आहेत व खाजगी विकासकाच्या पुनर्विकास योजनेस पसंती देत आहेत. हा सादर केलेला प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नाही. परंतु हा प्रस्ताव मान्य केल्यानंतर आपण किती दिवसात सदर इमारतीच्या कामास सुरुवात करु अशी विचारणा मा. सभापती हयांनी केली. ठेकेदार जर न्यायालयात गेला तर पुनर्रचनेच्या कामास आणखीन विलंब होऊ शकतो. त्यामुळे तोंडी आदेश न देता लेखी स्वरुपात आदेश देऊन ठेकेदाराविरुध्द न्यायलयत कॅव्हेट दाखल करण्यास सांगणे आवश्यक आहे. अन्यथा तदनंतर ठेकेदाराने न्यायालयात दावा दाखल केल्यास हया इमारतीतील रहिवाशांना आणखीन हालअपेष्टा सहन करण्याची पाळी येईल. सर्वसाधारण रहिवाशांची अशी अपेक्षा असते की, त्यांचे काम लवकरात लवकर व्हावे. त्यामुळे हा प्रस्ताव मान्य केल्यानंतर कदाचित तद्नंतर असे आक्षेप येण्याची शक्यता आहे की, हया ठेकेदाराचे काम काढून न घेता त्याच्याकडूनच जर काम करुन घेतले असते तर ते लवकर पूर्ण झाले असते. त्यामुळे हया सर्व बाबींचा काळजीपूर्वक विचार करुन निर्णय घेणे आवश्यक आहे.

मा. सदस्य, श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, हया कामासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे? तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया कामासाठी एकूण रु. १.७० कोटी खर्च अपेक्षित आहे. मा. सदस्य, श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नंतर अशी विचारणा केली की, आपल्या मंडळातील किती कामे सद्यः हया ठेकेदारामार्फत चालू आहेत? तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी असे प्रतिपादन केले की, सद्यः मंडळाचे एक काम हया ठेकेदारामार्फत चालू असून दुस-या अंतिम देयक प्राप्त झाले आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, हे काम हया ठेकेदारामार्फत यशस्वीरित्या पूर्ण करुन घेण्याच्या दृष्टीने आपण भरपूर प्रयत्न केलेले आहेत व तरीसुध्दा ठेकेदाराने काम सुरु केलेले नाही. हयाबाबत आपण कागदोपत्री आवश्यक ती नोंद घेऊन काळजी घेतलेली आहेच. सदर ठेकेदाराने जर हे काम सुरु केले असते तर हा प्रस्ताव सादर करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. आजच्या स्थितीला पुनर्रचनेची एकूण २८ कामे चालू आहेत. परंतु हे पहिलेच असे काम आहे की, ज्यामुळे मानसिक त्रास खूप झाला आहे. दर तीन-चार दिवसांनी हया इमारतीचे रहिवाशी त्यांची भेट घेऊन एकसारखा तगादा लावीत आहेत. एकदा तर रहिवाशांनी त्यांच्या कार्यालयात येऊन मंडळ काही कार्यवाही करीत नाही म्हणून अतिशय गोंधळ घातला होता. वास्तविक आपण करारपत्रातील तरतुदीनुसार कलम दोन, तीन अंतर्गत प्रशासनिक कार्यवाही केली आहे परंतु ही प्रक्रिया करण्यास वेळ जातो. आपण करारपत्रातील तरतुदींनुसार कार्यवाही केल्यानंतर त्याचे परिणाम

काय होतील हयाचा जर विचार करीत बसलो तर आपण कोणतीची कार्यवाही करु शकणार नाही व त्यामुळे हे काम असेच रखडले जाऊ शकते.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मागील तीन वर्षांपासून त्यांचेही म्हणणे असेच आहे की, जे ठेकेदार चांगले काम करीत नाहीत त्यांच्याविरुध्द कार्यवाही करुन त्यांना काळया यादीत टाकावे. जे ठेकेदार चांगले काम करतात अशा ठेकेदारांची निवडक यादी करुन अशा निवडक ठेकेदारांनाच काम देण्यात यावे असेही आपण मागील बैठकीत ठरविले होते. परंतु हयाबाबत अद्याप आपण काहीच कार्यवाही केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. नुकत्याच झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीतही हयाच मुद्दयांवर विस्तृत चर्चा झाली आहे. कामाचा दर्जा सुधारण्यासाठी तांत्रिक समितीचे गठन करावे हयाबाबतही चर्चा प्राधिकरणाच्या बैठकीत झाली.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, सदर ठेकेदाराने मंडळाकडे नवीन कामे बदली देण्याची मागणी केलेली आहे. हयामध्ये त्याने पंतप्रधान अनुदान प्रकल्प, जागतिक बँक प्रकल्प व मुंबई मंडळ इत्यादी ठिकाणच्या कामांचा समावेश आहे. मंडळाच्या मागील बैठकीमध्ये हया ठेकेदारास बदली कामे देण्याचा जो प्रस्ताव आपण फेटाळला त्यामध्ये मुंबई मंडळाच्या उपमुख्य अभियंता (स्थापत्य) हयांनी स्पष्ट अभिप्राय दिले आहेत की, सदर ठेकेदाराने केलेल्या हक्कांची (क्लेम्स) मागणी चुकीची आहे. त्यामुळे सदर ठेकेदाराने जर त्याबाबत न्यायालयात दावा दाखल केला तर प्रशासनास त्यास तोंड द्यावे लागेल.

हयाबाबत मा. सदस्य, श्री. सचिन सावंत हयांनी अशी विचारणा केली की, सदर ठेकेदाराकडे म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र आहे किंवा नाही? हयाबाबत असे निदर्शनास आले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग, म.न.पा. हयांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र असलेले ठेकेदार त्यांच्याकडे जरी म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र नसले तरी म्हाडाची कामे करु शकतात. मात्र फक्त म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र असलेले ठेकेदार इतर खात्यांची कामे करण्यास पात्र नाहीत. त्यामुळे इतर खात्यातील ठेकेदारांना म्हाडाची कामे देण्यापूर्वी म्हाडाच्या निकषांनुसार त्यांची पात्रता निश्चित करुन म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे असे वाटते. तसेच म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र असणे हे बंधनकारक करणे आवश्यक असून ज्या अन्वये आपण संबंधित ठेकेदराविरुध्द कार्यवाही करु शकतो. हया प्रकरणामध्ये सदर ठेकेदाराकडे जर म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र नसेल तर त्याला आपण काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करु शकतो का? अशीही विचारण मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांन केली.

मा. सभापती हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, आपण सदर प्रस्ताव मान्य करणे हे आवश्यक आहे. तसेच अशाप्रकारे इतर ठेकेदार जर काम करीत असतील त्यांनाही काळया यादीत टाकण्याचे प्रस्ताव मंडळापुढे सादर करावेत.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की,उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी सांगितल्यानुसार सद्यःस्थितीला पुनर्रचनेची एकूण २८ कामे चालू आहेत. परंतु हया एकाच कामामध्ये त्यांना मानसिक त्रास सोसावा लागला आहे. त्यामुळे मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी असे सुचविले की, त्यामुळे हया सर्व २८ कामांची पाहणी त्या त्या विभागातील मंडळाच्या सन्मा. सदस्यांनी करावी व त्या अनुषंगाने हया २८ कामांचा आढावा घेऊन त्याबाबतची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये ठेऊ, जेणेकरुन हया पुनर्रचना कामांचा आढावा घेऊन, ती कामे सुरळीतपणे चालू आहेत किंवा नाहीत हयाची माहिती प्राप्त होईल.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया २८ कामांचा अहवाल बैठकीमध्ये सादर करण्यापेक्षा सन्मा. सदस्यांनी त्यांच्या विभागातील पुनर्रचना कामांची पाहणी संबंधित अभियंत्यांसोबत करावी तसेच त्याठिकाणी रहिवाशांची भेट घेऊन त्यांच्या इमारतींच्या कामांबात रहिवाशांशी चर्चा करावी जेणेकरुन हया

कामांबाबत आपण किती दक्ष आहोत अशी भावना रहिवाशांच्या मनात निर्माण होईल. तदनंतर मा. सभापती हयांनी सदर प्रस्तावाबाबत सुचविले की, हया प्रस्तावात सुचविलेली कार्यवाही ही विधी विभागाच्या सल्ल्यानुसार करावी.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, हया प्रस्तावाबाबत विधी विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घेऊन ते मंडळाच्या बैठकीपुढे सादर करावेत व तदनंतर आपण हया प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेऊ.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, आपण हा प्रस्ताव मान्य केल्यानंतर ठेकेदार न्यायालयात दावा दाखल करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. न्यायालयीन दाव्याचा निकाल जर १० वर्षांनंतर लागला तर त्यामध्ये रहिवाशांचे अतोनात हाल होतील. त्यामुळे प्रस्तावांतर्गत सुचविलेली कार्यवाही करण्यापूर्वी विधी विभागाचे अभिप्राय घेणे संयुक्तिक होईल असे वाटते.

मा. सभापती हयांनी हयाबाबत असे सुचविले की, आपण हया प्रस्तावास तत्वतः मान्यता देऊ. परंतु प्रस्तावांतर्गत कार्यवाही करण्यापूर्वी त्याबाबत विधी विभागाचे लिखित अभिप्राय प्राप्त करुन घेऊन ते त्यांना व मंडळाच्या तीन-चार सन्मा. सदस्यांना दाखवून नंतर पुढील कार्यवाही करावी, जेणेकरुन कार्यवाही केल्यानंतर त्यास मंडळास जबाबदार धरले जाणार नाही. तदनुसार हा प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तदनुषंगाने विनंती केली की, मा. सभापती हयांनी सुचविल्यानुसार हया प्रस्तावाची सविस्तर टिप्पणी तयार करुन ती विधी विभागाकडे अभिप्रायांसाठी सादर केली जाईल व विधी विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर ते मा. सभापती, मंडळाचे सन्मा. सदस्य व संबंधित रहिवाशांना दाखवून विधी विभागाच्या अभिप्रायांनुसार पुढील कार्यवाही ही मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये तत्संबंधी निर्णय न घेता त्यास मंडळाची मंजूरी गृहीत धरुन अभिप्राय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्वरित सुरु करण्यास परवानगी द्यावी.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, विधी विभागाच्या अभिप्रायांनुसार करावयाची कार्यवाही ही मंडळाच्या बैठकीचा निर्णय स्थायी होण्यापूर्वी करता येऊ शकते का? हयाबाबतही विधी विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण जी कार्यवाही करणार आहोत ती करारपत्रातील तरतुदींच्या आधिन राहूनच करणार आहोत.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, प्रस्तावात सादर केल्यानुसार हया ठेकेदाराविरुध्द आपण ब-याच कागदोपत्रांची नोंदी ठेवल्या आहेत.

वरील सविस्तर चर्चेअंती, सदर प्रस्तावांतर्गत सुचविण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत विधी विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घेऊन ते मा. सभापती, मंडळाचे ४-५ सन्मा. सदस्यांना दाखवून त्याबाबत मंडळाचा निर्णय पुढील बैठकीमध्ये स्थायी करण्याची वाट न पाहता सदर कार्यवाहीस मंडळाची मान्यता गृहीत धरुन विधी विभागाच्या अभिप्रायांनुसार पुढील कार्यवाही अभिप्राय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्वरित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक ८७/६७९**

**इ.क्र.७-९-११, २४डी, फितवाला रोड, हया इमारतीच्या जोत्यावरील बांधकामाचे ठेकेदार मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हयांच्याविरुध्द प्रस्तावांतर्गत सुचविल्यानुसार खालील कार्यवाही करण्यास सर्वानुमते तत्वतः मंजूरी देण्यात आली.**

**१) ठेकेदार मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हयांचा कारारनामा रद्द करुन करानाम्यातील कलम-३ (सी) नुसार उर्वरित काम अल्प मुदतीची निविदा मागवून अन्य ठेकेदाराची नियुक्ती करुन करावे,**

**२) ठेकेदार मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हया ठेकेदाराची कोणत्याही कामांची देयके यापुढे अदा करु नयेत, जेणेकरुन हया इमारतीच्या पुनर्रचनेचे काम त्यांच्या जबाबदारीवर व त्यांच्या पैशातून अन्य ठेकेदाराकडून करणे शक्य होईल,**

**३) ठेकेदार मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हयांची ठेकेदार म्हणून झालेली नोंदणी रद्द करुन त्यांचे नाव काळया यादीत टाकावे,**

**४) नोंदणी रद्द करेपर्यंत दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी करारपत्राची मुदत नोंदणी रद्द करण्याच्या सूचनेच्या तारखेपर्यंत वाढवून द्यावी.**

**सदर प्रस्तावांतर्गत वरीलप्रमाणे सुचविण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत विधी विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन ते मा. सभापती, मंडळाचे ४-५ सन्मा. सदस्यांना दाखवून त्याबाबत मंडळाचा निर्णय पुढील बैठकीमध्ये स्थायी करण्याची वाट न पाहता सदर कार्यवाहीस मंडळाची मान्यता गृहित धरुन विधी विभागाच्या अभिप्रायांनुसार पुढील कार्यवाही अभिप्राय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्वरित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

---

२) विषय- इ.क्र.८१, मोरलँड रोड हया इमारतीतील सद्यः संक्रमण शिबीरात राहणा-या मूळ व पोट भाडेकरुंना कायमस्वरुपी जागा देणेबाबत.

---

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी (प्र) असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीमध्ये विषयांकित इमारतीतील सद्यः मंडळाच्या संक्रमण शिबीरात राहणा-या मूळ व पोट भाडेकरुंना कायम स्वरुपी जागा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मूळ व पोट भाडेकरुंच्या पुनर्वसनाच्या तरतुदींच्या अनुषंगाने हा प्रस्ताव असा फेर सादर करण्यात येत आहे की, हया इमारतीतील जे ५६ मूळ व भाडेकरु आहेत त्यांना रमाबाई नगर येथे होणा-या पोलीस गृहनिर्माण योजनेतील ९०४ गाळयांपैकी ५६ गाळे त्यांची पात्रता निश्चित करुन कायम स्वरुपी देण्याचे प्रस्तावित आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पात्रता निश्चीत करताना हया रहिवाशांची रहिवास हक्काची जूनी कागदपत्रे तपासावीत जेणेकरुन भविष्यात कायदेशीर अडचणी निर्माण होणार नाहीत. हा विषय पूर्वी २-३ वेळा चर्चिला गेला असून हयाबाबत प्राधिकरणाच्या बैठकीमध्येही चर्चा झाली आहे. हे प्रकरण मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मतदारसंघातील असून तेथील लोकप्रतिनिधी श्री. विरेंद्र बक्षी हयांनीही हया प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेण्याविषयी एकसारखा तगादा लावला आहे. प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये हया

विषयाबाबत विचारणा झाल्यानंतर आपण असे सांगितले की, हयाबाबत मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा करुन त्याबाबत त्वरित निर्णय घेतला जाईल.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही इमारत दुरुस्तीसाठी जेव्हा हाती घेतली की, ही इमारत दुरुस्तीसाठी जेव्हा हाती घेतली होती तेव्हा हया इमारतीतील गाळे खाली करुन घेऊन त्यातील मुळ व पोट भाडेकरुंना मंडळाने संक्रमण शिबीरात जागा दिली होती. इमारतीची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर मात्र हया इमारतीतील संक्रमण शिबीरात राहणा-या मुळ व पोटभाडेकरुंना त्यांच्या मूळ इमारतीतील गाळयांचा ताबा दिला गेला नाही व त्यामुळे ते आजही मंडळाच्या संक्रमण शिबीरात रहात आहेत. हया रहिवाशांचे मूळ इमारतीतील गाळे त्रयस्थ व्यक्तींनी बळकावले असून सद्यः त्याठिकाणी त्रयस्थ व्यक्ती रहात आहेत. मंडळाने हया रहिवाशांच्या मूळ इमारतीतील जागा खाली करुन मंडळाच्या संक्रमण शिबीरात स्थलांतरित केले असल्याने हया ५६ मुळ व पोट भाडेकरुंच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाची जबाबदारी ही मंडळाची आहे. हे रहिवाशी सन १९८८ पासून मंडळाच्या संक्रमण शिबीरात रहात आहेत.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने अशी विचारणा केली की, हया इमारतीतील मुळ भाडेकरु व पोट भाडेकरु किती होते? तदनुषंगाने सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मूळ भाडेकरु २२ होते व पोट भाडेकरु ४६ होते.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर अशी विचारणा केली की, हया इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यामध्ये नवीन किती गाळे बांधण्यात आले? सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीची दुरुस्ती करण्यात आली आहे व हया इमारतीतील मूळ व पोट भाडेकरुंचे गाळे त्रयस्थ व्यक्तींनी बळकावून त्याठिकाणी व्यवसाय सुरु केले आहेत.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील मूळ व पोट भाडेकरुंचे गाळे त्रयस्थ व्यक्तींनी बळकावले असतील तर ते गाळे अशा त्रयस्थ व्यक्तींकडून खाली करुन घेणे आवश्यक आहे. हयाबाबत कार्यवाही करणे आवश्यक असताना मूळ व पोटभाडेकरुंना मंडळाने इतर ठिकाणी कायमस्वरुपी जागा देणे संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी अशा सूचना केल्या की, मूळ व पोटभाडेकरुंची मदत घेऊन तसेच आवश्यकता असल्यास पोलीसांची कुमक मागवून मूळ इमारतीतील गाळे त्रयस्थ व्यक्तींकडून खाली करुन घेण्याची कार्यवाही त्वरित करावी व गाळे खाली करुन घेतल्यानंतर असे गाळे मूळ व पोटभाडेकरुंना पुन्हा द्यावेत.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हा प्रस्ताव जर आपण मान्य केला तर आपल्या मंडळाची बदनामी होईल. त्यामुळे हा प्रस्ताव मंजूर न करणे संयुक्तिक होईल.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हा प्रस्ताव जर आपण मंजूर केला तर भविष्यात अशा प्रकारच्या इतर पोट भाडेकरुंनाही मंडळास कायमस्वरुपी जागा द्यावा लागतील.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीमध्ये ज्यावेळी हयाबाबत चर्चा करण्यात आली होती त्यावेळी आपण अशी विचारणा केली होती की, अशा पोट भाडेकरुंची एकूण संख्या किती आहे, ज्यांना आपणांस कायमस्वरुपी गाळे द्यावे लागतील. परंतु हयाबाबतची माहिती अद्याप सादर करण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मूळ भाडेकरु २८ इसताना ४६ पोट भाडेकरु कसे होऊ शकतात? ही न समजण्यासारखी बाब आहे. गिरगाव विभागामध्ये काही इमारतींच्या

छप्पराला लागून असलेल्या मजल्यावर उंची जास्त असल्याने त्याठिकाणी पोट भाडेकरु रहात आहेत. मात्र एका मूळ भाडेकरुच्या वरील भागात एकच पोट भाडेकरु रहात आहे. हया सूत्रानुसार २२ मूळ भाडेकरुंच्या खोल्यांच्या वरील भागात जास्तीत जास्त २२ पोटभाडेकरु राहू शकतात. त्यामुळे २२ मूळ भाडेकरुंच्या खोल्यांतील वरील भागात ४६ पोट भाडेकरु कसे रहात असतील हे समजू शकत नाही.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, २२ मूळ भाडेकरुंच्या खोल्यांतील वरील भागात ४६ पोट भाडेकरु कसे रहात असतील किंवा ही बाब बरोबर आहे की चुकीची आहे हयाबाबत चर्चा करण्यापेक्षा हया भाडेकरुंना मंडळाने जागा खाली करण्याच्या सूचना दिल्या आहेत व तद्नंतर मंडळाने त्यांना संक्रमण शिबीरात जागाही दिल्या आहेत.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, जागा खाली करण्याच्या नोटीसा देऊन संक्रमण शिबीरात जागा देण्याची जी कार्यवाही केली आहे ती पूर्णतः चुकीची आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणाची सुरुवात चुकीच्या प्रक्रियेने झाली असून आपण जर हया ५६ भाडेकरुंना कायमस्वरुपी जागा दिल्या तर तो निर्णयही चुकीचा होणार आहे. त्यामुळे हया प्रकरणाची संपूर्ण चौकशी करुन तद्नंतरच त्याबाबत निर्णय घेणे संयुक्तिक होईल.

पूर्तता :- उ.मु.अ .(सं.शि.)

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी सुचविल्याप्रमाणे हया प्रकरणाची चौकशी करुन नंतर निर्णय घेण्यास हरकत नाही. परंतू दरम्यानच्या कालावधीत अशा त्रयस्थ व्यक्तींकडून गाळे खाली करुन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे तसेच हयाबाबत पोलीस ठाण्यामध्येही तक्रार करणे आवश्यक आहे. सदर कार्यवाही तात्काळ करण्याच्या सूचना मा. सभापती यांनी दिल्या.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, हया मुळ व पोट भाडेकरुंना जेव्हा जागा खाली करण्याच्या सूचना दिल्या होत्या त्यावेळी त्यांच्या जून्या इमारतीतील रहिवाशी हक्काची कागदपत्रे तपासून जागा खाली करण्याच्या सूचना दिल्या होत्या किंवा कसे हयाबाबतही चौकशी करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे सुचविले की, जागा खाली करण्याच्या सूचना देण्याच्या प्रक्रियेपासून संक्रमण शिबीरात गाळे वाटप केल्याच्या प्रक्रियेपर्यंतची संपूर्ण चौकशी करुन चौकशी अहवालासह हा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत फेर सादर करावा. मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत व मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तद्नुषंगाने असे सुचविले की, अशी महत्वाची प्रकरणे आयत्या वेळच्या विषयात सादर न करता हा प्रस्ताव कार्यसूचीमध्ये समाविष्ट करुन मंडळाच्या पुढील बैठकीत फेर सादर करावा.

---------------oo-----------------

39

३) विषय- इ.क्र.२८९-२९९ व २९९ अे ते ई, बोटावाला चाळ, रामभाऊ भोगले मार्ग हया इमारतीच्या संयुक्त पुनर्बांधणीच्या योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

............................

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित सहा इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली आहे. हया ६ जून्या इमारतींमध्ये एकूण ४१३ निवासी + १० अनिववासी = ४२३ भाडेकरु/रहिवाशी असून नियोजित पुनर्बांधणी योजनेमध्ये म.न.पा. ने मंजूर केलेल्या नकाशांनुसार एकूण ५४३ निवासी + १० अनिववासी = ५५३ गाळे बांधण्याचे प्रस्तावित आहे. एकूण १३० निवासी गाळे मंडळास अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. हया संपूर्ण पुनर्बांधणी योजनेसाठी अंदाजे रु.१४,९१,४८,१२९/- खर्च अपेक्षित आहे. ही संपूर्ण योजना दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात तीन इमारतींची (२८९-२९९, २९९अे व २९९ बी) पुनर्रचना करण्यात येणार आहे. उर्वरित तीन इमारतींची (२९९-सी, २९९-डी व २९९-ई) पुनर्रचना दुस-या टप्प्यांतर्गत केली जाणार आहे. हया संपूर्ण योजनेच्या रु. १४,९१,४८,१२९/- हया अंदाजित खर्चास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक असून इ.क्र.२८९-२९९ ही म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (१) (ब) प्रमाणपत्रान्वये घोषित करण्याचा प्रस्ताव आहे.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांना ज्या जागा खाली करण्याच्या सूचना दिल्या आहेत त्यामध्ये भाडेकरु व रहिवाशी म्हणून दोघांची नावे टाकण्यात आली आहेत. त्यामुळे रहिवाशांनी अशी विचारणा केली आहे की, नवीन इमारतीतील गाळयांचे वाटप करताना ते कोणाच्या नावे (भाडेकरु की रहिवाशी) केले जाईल. हयाबाबत मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी असे सुचविले की, त्यांचे गाळे सद्यः त्याठिकाणी राहणा-या रहिवाशांना विहित विक्री करारपत्र करुन विकले असल्याने नवीन इमारतीतील गाळे हे सद्यःच्या रहिवाशांच्या नावे वाटप करणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सद्यः हया इमारती मंडळाच्या मालकीच्या नाहीत. भूसंपादन कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर हया इमारती मंडळाच्या मालकीच्या होतील. त्यानंतर नवीन इमारतीत वाटप केलेले गाळे भाडेकरु हक्क हस्तांतरणांतर्गत संबंधित रहिवाशांच्या नावे केले जातील.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली आहे की, भाडेकरु हक्क हस्तांतरणासाठी मंडळाकडून काही शुल्क आकारले जाते का? व ते आकारले जात असताना किती आहे?

तदनुषंगाने मिळकत व्यवस्थापक (पु.गा.) असे प्रतिपादन केले की, वारसा हक्काच्या भाडेकरु हक्क हस्तांतरण प्रकरणात रु.५०००/- शुल्क आकारले जाते.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, डिसेंबर १९७१ साली आदरणीय श्रीमती.इंदिरा गांधी हयांनी असे आदेश काढले होते की, जे लोक ज्या घरात रहातात ते त्या घराचे मालक, जो जी जमीन कसतो ती जमीन त्याच्या मालकीची. त्यानुसार येथील भाडेकरु जे रहिवाशी आहेत तेच मालक का होऊ शकत नाहीत?

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हे जे रहिवाशी फार वर्षापासून सदर इमारतीत रहात आहेत त्यांना आपण भाडेकरु हक्क देतच असतो. ज्या ठिकाणी भाडेकरु व रहिवाशी वेगळे असतात अंशा ठिकाणी भविष्यात जर भाडेकरुने त्याच्या भाडेकरु हक्काचा दावा दाखल केला तर कायदेशीर अडचणी उदभवू नयेत म्हणून आपण जागा खाली करण्याच्या सूचनांमध्ये भाडेकरु तसेच रहिवाशाच्याही नावाचा उल्लेख करतो.

वरील सविस्तर चर्चेअंती, विषयांकित इमारतीच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्याचे तसेच इ.क्र.२८९-२९९ ला ८८ (३)(ब) प्रमाणपत्र जारी करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८७/६८०**

इ.क्र.२८९-२९९ व २९९ अे ते ई, बोटावाला चाळ, रामभाऊ भोगले मार्ग हया इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणीच्या योजनेच्या रु. १४,९१,४८,१२९/- खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच इ.क्र.२८९-२९९ हया इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

--------------oo---------------

४) विषय- मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील ०६ प्रस्ताव पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

१. भुकर पहाणी क्र.१२७ व १२८ ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-३९६७ व डी-३९७२, इ.क्र. ४०२-४०६ व ४०८ ए, मौलाना शौकत अली रोड, डी. विभाग, मुंबई येथील " अली मोहम्मद मॅन्शन व लक्ष्मी निवास " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२. भूकर पाहणी क्र.१८१०, १८११ व १८१२ मांडवी विभाग, विभाग क्र. बी-३४३३, बी-३४३४ व बी-३४३५, इ.क्र.४, ६, व ८-१०, डोंगरी क्रॉस लेन, बी.विभाग, मुंबई येथील मालमत्तेच्या संयुक्त पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३. भूकर पाहणी क्र.१८१८, १८२० व १/१८२० माहीम विभाग, भूखंड क्र.१०८, ११० व ११०ए, शिवाजी पार्क योजना, उपकर क्र. जीएन-४६६८(२) ४३७२(५), ४३७२(५ए), इ.क्र.७१/४०, ७१ए/४०, ७३/४०, कॅडेल रोड (१०८, ११०, ११०ए, डॉ. एम.बी.राऊत रोड), शिवाजी पार्क,दादर,मुंबई येथील " विद्युत ", " शांतीकुंज " व " राम कुटीर " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४. भुकर पहाणी क्र.५६६,गिरगांव विभाग, विभाग क्र. डी-१०७८, इ.क्र.२९ बी,खोताची वाडी, गिरगाव, मुंबई येथील " चौधरी हाऊस " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

 ३५

५. भुकर पहाणी क्र.३९८/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र. ४४५, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र.एफ.एन. ७९२२ (३) इ.क्र.१२, महिलाश्रम रोड, माटूंगा, मुंबई येथील " सोमैया बिल्डिंग " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

६. भूकर पाहणी क्र.८०१, ८०२ व १४/८३४, मलबार कंबाला हिल विभाग,उपकर क्र. डी-३६२४-२६, इ.क्र.१०, महालक्ष्मी टेंपल रोड, मुंबई येथील " कस्तुरबाई बिल्डिंग " म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

उपरोक्त ०६ प्रस्तावांबाबतची प्रस्तावनिहाय माहिती सचिवांनी सविस्तरपणे सभागृहास दिली. हया सविस्तर माहितीच्या अनुषंगाने प्रत्येक प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये नियमाप्रमाणे ७० टक्के भाडेकरू/रहिवाश्यांची संमत्ती असून मालमत्ताधारक/ मुखत्यारपत्रधारक/ विकासक हयांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. तसेच क्षेत्रीय अधिका-यांनी रहिवाश्यांची यादी , त्यांच्या गाळयांचे क्षेत्रफळ, जुन्या इमारतींचे नकाशे तसेच अपरिवर्तनीय संमत्तीपत्रे तपासून प्रमाणित केलेली आहेत.

वरील सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी अ.क्र.१ ते १० वर सादर केलेल्या प्रस्तावांना, प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांकः ८७/६८१**

**मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी मालमत्ताधारक / मुखत्यारपत्रधारक / विकासक हयांच्याकडून प्राप्त झालेल्या खालील ६ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

१. भुकर पहाणी क्र.१२७ व १२८ ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-३९६७ व डी-३९७२, इ.क्र. ४०२-४०६ व ४०८ ए, मौलाना शौकत अली रोड, डी. विभाग, मुंबई येथील " अली मोहम्मद मॅन्शन व लक्ष्मी निवास " म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

२. भूकर पाहणी क्र.१८१०, १८११ व १८१२ मांडवी विभाग, विभाग क्र. बी-३४३३, बी-३४३४ व बी-३४३५, इ.क्र.४, ६, व ८-१०, डोंगरी क्रॉस लेन, बी.विभाग, मुंबई येथील मालमत्ता.

३. भूकर पाहणी क्र.१८१८, १८२० व १/१८२० माहीम विभाग, भूखंड क्र.१०८, ११० व ११०ए, शिवाजी पार्क योजना, उपकर क्र. जीएन-४६६८(२) ४३७२(५), ४३७२(५ए), इ.क्र.७१/४०, ७१ए/४०, ७३/४०, कॅडेल रोड (१०८, ११०, ११०ए, डॉ. एम.बी.राऊत रोड), शिवाजी पार्क,दादर,मुंबई येथील " विद्युत ", " शांतीकुंज " व " राम कुटीर " नावाने ओळखली जाणारी मालमत्ता.

४. भुकर पहाणी क्र.५६६,गिरगांव विभाग, विभाग क्र. डी-१०७८, इ.क्र.२९ बी,खोताची वाडी, गिरगाव, मुंबई येथील " चौधरी हाऊस " म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

५. भुकर पहाणी क्र.३९८/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र. ४४५, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र.एफ.एन. ७९२२ (३) इ.क्र.१२, महिलाश्रम रोड, माटूंगा, मुंबई येथील " सोमैया बिल्डिंग " म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

६. भूकर पाहणी क्र.८०१, ८०२ व १४/८३४, मलबार कंबाला हिल विभाग,उपकर क्र. डी-३६२४-२६, इ.क्र.१०, महालक्ष्मी टेंपल रोड, मुंबई येथील " कस्तुरबाई बिल्डिंग " म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

----------oo------------------

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हयांच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने जो मुद्दा उपस्थित केला गेला होता त्यानुसार म्हाडाकडील कामे करण्यासाठी म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक करणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मागच्या दि. २० तारखेच्या प्राधिकरणाच्या बैठकीत हया मुद्दयाबाबत बरीच चर्चा झाली आहे. हया बैठकीत असे प्रतिपादन केले होते की, सन १९८४-८५ पासून म्हाडामध्ये नोंदणी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया चालू आहे व आपण म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या ठेकेदारासच कामे देत होतो. सन १९९६ मध्ये हयाबाबत झालेल्या चर्चेत असे सांगितले गेले की, म्हाडा सोडून इतर विभागांचे नोंदणी प्रमाणपत्र असणा-या ठेकेदारानाही कामे दिली गेली नाहीत. त्यावेळेस असे प्रतिपादन करण्यात आले होते की, महाप्रकल्पाच्या कामांसाठी जी निवडक ठेकेदारांची यादी तयार कण्यात आली होती अशा निवडक ठेकेदारांनाही म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे तसेच म.न.पा. किंवा सार्वजनिक विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र असणा-या ठेकेदारांना जर म्हाडाची कामे हवी असल्यास सदर ठेकेदारांनी म्हाडाचेही नोंदणी प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्यावेळी पुणे मंडळाच्या त्यावेळच्या मा. सभापतींनी असे सांगितले की, त्यांच्या मंडळात म्हाडाकडील नोंदणीकृत ठेकेदारांची संख्या अतिशय कमी असल्याने त्यांना त्यांच्या मंडळातील कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदारांना देणे आवश्यक आहे. तत्कालीन उपाध्यक्ष व मु.का.अ./प्राधिकरण हयांनीही त्या अनुषंगाने असे सुचविले की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र हे सर्वमान्य असल्याने अशा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदणीकृत ठेकेदारांना म्हाडाची कामे देणे आवश्यक आहे. त्यावेळी असेही सांगण्यात आले होते की, अशा बाहेरील नोंदणीकृत ठेकेदारांविरुध्द काही कार्यवाही करावाची झाल्यास त्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात यावे व तदनंतर म्हाडाची कामे म्हाडाबाहेरील नोंदणीकृत ठेकेदारांना देण्यास सुरुवात झाली. उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत मंडळास अशी विनंती केली की, म्हाडाकडील कामे ही फक्त म्हाडाचे नोंदणी प्रमाणपत्र असणा-या ठेकेदारानांच देण्याच्या दृष्टीने आजच्या बैठकीत ठराव संमत करुन तो प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी सादर करु.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे सुचविले की, हया बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने हयाबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो मंडळाच्या पुढील बैठकीत प्रथम सादर करावा व तदनंतर त्याबाबत निर्णय घेऊन प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीपुढे सादर करावा.

---------------oo--------------

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, पुनर्विकास योजनेंतर्गत मंडळास मिळणा-या अतिरिक्त गाळयांचे वाटप बृहतसूचीवरील रहिवाशांना करताना संबंधित रहिवाशांकडून आपण रु. २३५/- प्रति चौ.फू. दर आकारुन किंमत वसूल करुन वाटप करतो. मात्र हा रु. २३५/- प्रति चौ.फू. दर आकारण्या मागील कोणतीही कारणमीमांसा अद्याप सादर केलेली नाही.

मिळकत व्यवस्थापक (पु.गा.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्विकास योजनेतून उपलब्ध होणा-या अतिरिक्त गाळयांपोटी विकासकास मंडळ रु. २३५/- प्रति चौ.फू. दराने किंमत अदा केली जाते व त्यामुळे ही किंमत त्याच दराने आपण संबंधित रहिवाशांकडून वसुल करतो.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, हया मुद्याबाबतचा निर्णय मागील दोन-तीन बैठकींपासून प्रलंबित असल्याने तो स्वतः, मुख्य अधिकारी, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) व मंडळाचे दोन, तीन सदस्य एकत्र बसून चर्चा करतील व त्याबाबत निर्णय घेतला जाईल. आपण संक्रमण शिबीरातील वा इतर ठिकाणच्या गाळयांची विक्री रेडी रिकोनरप्रमाणे बाजारभावांचे दर आकारुन करतो. हयामधून मंडळास आर्थिक उत्पन्न व्हावे हा त्यामागील उद्देश आहे. परंतु पुनर्विकास योजनांतर्गत गाळयांसाठी रु. २३५/- प्रति चौ.फू. हा वेगळा दर कोणत्या आधारावर आकारला जातो हयाबाबत रहिवाशी विचारणा करतात. वास्तविक बृहतसूचीवरील रहिवाशांस आपण पुनर्विकास योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अतिरिक्त गाळयाऐवजी अन्य ठिकाणच्या गाळयाचे वाटप केले तर त्यापोटी आपण त्याच्याकडून कोणतीच रक्कम वसूल करीत नाही. कारण बृहतसूचीवरील रहिवाशांच्या पुनर्वसनाची नैतिक जबाबदारी मंडळाची आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे सुचविले की, मा. सभापती हयांनी सुचविल्यानुसार हयाबाबत आपण एक खास संयुक्त बैठक घेऊन त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेऊ.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, जे रहिवाशी मंडळाच्या संक्रमण शिबीरात रहात आहेत त्यांना आपण कायमस्वरुपी गाळा देण्यास बांधील असताना त्यांच्याकडून रु. २३५/- प्रति चौ.फू. दराने किंमत वसूल करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने पुढील आठवडयात हया विषयाबाबत खास बैठक घेऊन त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे प्रतिपादन केले.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्विकास योजनेंतर्गत उपलब्ध होणारे गाळे आपण संबंधित पुनर्विकास योजनांऐवजी त्याच विभागातील इतर ठिकाणी घेण्याचा निर्णय झालेला आहे. परंतु हा निर्णय जरी चांगल्या दृष्टीकोनातून घेतला गेला असेल तरी तो चुकीचा आहे. हयाचे कारण असे आहे की, दुस-या ठिकाणी देण्यात येणारा गाळा व पुनर्विकासाच्या ठिकाणचा गाळा हयांच्या बाजारभावाच्या दरांमध्ये बराच फरक असतो तसेच पुनर्विकास योजनांतर्गत बांधल्या जाणा-या इमारतींचा दर्जा व इतर ठिकाणच्या इमारतींचा दर्जा हयामध्ये बरीच तफावत असते. त्यामुळे खास घेतल्या जाणा-या बैठकीत हयाबाबतही चर्चा करुन निर्णय घेणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्विकास योजनेंतर्गत प्राप्त होणारे अतिरिक्त गाळे त्याच विभागातील इतर इमारतींमध्ये स्विकारण्याचा निर्णय हा प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यामुळे हयाबाबत मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी सुचविलेला प्रस्ताव आपणांस प्राधिकरणाकडे सादर करावा लागेल. परंतु पुनर्विकास योजनेंतर्गत आपण अन्य ठिकाणी गाळे घेताना पुनर्विकास योजनेच्या ठिकाणच्या बाजारभावाचा दर व इतर ठिकाणी देण्यात येणा-या ठिकाणी देण्यात येणा-या बाजारभावाचा दर हयामधील जो फरक असतो त्या फरकाच्या किंमतीनुसार देय क्षेत्रफळापेक्षा अधिक क्षेत्रफळ विकासकाकडून घेत असतो. मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांच्या मतानुसार आपण जर बाजारभावाच्या फरकाच्या किंमतीनुसार देय अतिरिक्त क्षेत्रफळापेक्षा अधिक क्षेत्रफळ घेत असलो तरी ज्या विभागामध्ये अतिरिक्त क्षेत्रफळ देणे आवश्यक

असते त्या ठिकाणच्या परिसराचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे हयाबाबतच्या भावना आपण सविस्तर चर्चा करुन प्राधिकरणास कळवू.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, ब-याच मुद्दयांबाबत आपण मंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेत असतो किंवा काही प्रकरणी कार्यवाही करणे आवश्यक असते. परंतु असे निदर्शनास आले आहे की, आपण घेतलेल्या निर्णयानुसार किंवा करावयाच्या कार्यवाहीनुसार पुढील कार्यवाही केली जात नाही. हयाबाबत कार्यवाही केली जाते किंवा नाही याची माहिती सादर करणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, असे प्रकार मागील दोन-तीन बैठकीपासून होत आहेत हयाचे कारण असे आहे की, सद्यः ब-याचशा अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या बदल्या झाल्या आहेत. त्यामुळे थोडेसे दुर्लक्ष झालेले आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मा. सभापती हयांनी तदनुषंगाने सचिव हयांना असे आदेश दिले की, येथून पुढे मंडळाच्या बैठकीत जे जे निर्णय घेतले जातात त्याबाबत जी जी कार्यवाही केली जाते त्याचा अनुपालन अहवाल मंडळाच्या प्रत्येक बैठकीपुढे सादर करण्यात यावा.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीमध्ये आपण माटुंगा येथील मोहन बिल्डिंगच्या दुरुस्तीबाबत चर्चा केली होती. हया इमारतीच्या दुरुस्तीनंतर दुरुस्ती उपकरात वाढ करण्यात आली असून तदनंतर हया इमारतीच्या मालकाने असे कळविले होते की, तो दुरुस्तीचा मंडळाने केलेला सर्व खर्च मंडळाकडे भरण्यास तयार आहे व त्यामुळे दुरुस्ती उपकरात वाढ करु नये अशी विनंती त्याने केली होती. हयाबाबत विधी विभागाचे अभिप्राय घेऊन कार्यवाही करण्याचे ठरले होते परंतु पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे अशी विचारणा मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी केली.

तद्नुषंगाने का.अ.(फग/उ) विभाग कार्यालयातील संबंधित प्रभारी कार्यकारी अभियंता श्री. गोसावी हयांनी असे प्रतिपादन केले की, हयाबाबतचा प्रस्ताव विधी विभागाकडे सादर केला असून त्यांच्याकडून अद्याप अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, ठराविक प्रकरणांबाबत मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यापेक्षा संबंधित सन्मा. सदस्यांनी त्यांचे अधिकार वापरुन संबंधित अधिका-यांशी अशा प्रकरणांबाबत चर्चा करावी व त्याबाबतची माहिती द्यावी. मात्र त्यांनी सांगितल्यानुसार अधिकारीवर्गाकडून काही कार्यवाही होत नसेल तरच अशी प्रकरणे मंडळाच्या बैठकीत उपस्थित करावीत.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी व मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीमध्ये आपण अडगळीच्या, त्रिकोणी आकाराच्या तसेच वेडयावाकडया आकाराच्या गाळयांच्या विक्रीच्या दराबाबत चर्चा केली होती. परंतु दर निश्चितीबाबत पुढे काहीच कार्यवाही झालेली नाही.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, अशा सर्व प्रलंबित प्रकरणांबाबत आपण एक संयुक्त बैठक घेऊ. हया बैठकीत सर्व संबंधित अधिकारी, सर्व सन्मा. सदस्य यांना आमंत्रित करुन त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेऊ. प्रलंबित प्रकरणे ही मुख्यत्वे सहमुख्य अधिकारी हयांच्याशी संबंधित असून ते गेला एक महिनाभर ते रजेवर असल्याने ही प्रकरणे प्रलंबित राहीली आहेत. त्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याच्या सूचना सहमुख्य अधिकारी हयांना देण्यात आलेल्या आहेत.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत चिखलवाडी येथील पुनर्रचित इमारतीत वेलफेअर सेंटर बांधण्यास परवानगी देण्याबाबत चर्चा झाली होती. परंतु त्याबाबत पुढे काहीच कार्यवाही करण्यात आलेली नाही.

२३

मा. सभापती' हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, चिखलवाडी येथे वेलफेअर सेंटर बांधण्यासाठी आमदार निधी प्राप्त होणार आहे. ही जागा आपली असल्याने महानगरपालिकेची मंजूरी घेण्याच्या अटीवर परवानगी देण्याचे ठरले होते. त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश मा. सभापती हयांनी दिले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास नुकतीच २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मा. सभापती यांच्या हस्ते सर्व सन्मा. सदस्यांना भेटस्वरुपी सुवर्णमुद्रा देण्यात आल्या.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती हयांनी उपस्थित सन्मा सदस्य, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले तसेच मंडळाची पुढील बैठक शुक्रवार दि. ७ एप्रिल २००३ रोजी दुपारी ४.०० वाजता घेण्यात येईल असे जाहीर केले.

सचिव/मुंइदुवपुमं

मुख्य अधिकारी/मुं.इ.दु. व पु.मंडळ

मा. सभापती/ मुं.इ.दु. व पु.मंडळ

परिशिष्ट "क"

**मंडळाच्या दिनांक ७/३/२००३ रोजी बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकांची यादी.**

| अ.क्र | इमारतीचा तपशिल | दुरुस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र | मजल्यांची संख्या | इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम | निव्वळ टप्प्याची रक्कम | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यातील | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ विभाग** | | | | | | | | |
| १. | २३५ पेरिन नरिमन स्ट्रीट | तिसरा / नाहप्र | तळ + ४ / ४ + ३ = ७ | ४०९.५० / ४३७५.७९ | १७९१८८९.०० | १७२१७८५.०० | ३३९३९९.०० | १३८२३८६.०० | मंजूर |
| २. | १०३-१०३ ए शहिद भगतसिंग रोड | दुसरा/फेरबदल / मंडळ | तळ + ४ / १७ + ५ = २२ | १९४३.७० / ३२४.४६ | ६६५६५८.०० | ४९५८२९.०० | ४९५८२९.०० | ० | मंजूर |
| | **ब विभाग** | | | | | | | | |
| ३. | १-३ जेल रोड क्रॉस लेन (उत्तर) | तिसरा / मंडळ | तळ + ३ / १३ + ३ = १६ | १००१.८२ / ९५९.७१ | ९६१४६६.०० | ४१४९६६.०० | ४१४९६६.०० | ० | मंजूर |
| ४. | ३२ जेल रोड | तिसरा / मंडळ | तळ + १ / ६ + २ = ८ | २९३.४६ / ९८६.३७ | २८९४६३.०० | १४२७३३.०० | १४२७३३.०० | ० | मंजूर |
| ५. | ३८ कर्नाक बंदर रोड, एल टी. मार्ग | दुसरा / मंडळ | तळ + ४ / १७ + १ = १८ | ७५१.२४ / १००२.१६ | ७५२८६५.०० | ५२७२९३.०० | ५२५६६८.०० | १६२५.०० | मंजूर |
| ६. | ३ तांडेल स्ट्रीट (दक्षिण) | तिसरा/सु. / मंडळ | तळ + ४ / २९ + १२ = ४१ | १७६७.९६ / १०२०.०० | १८०३३३४.०० | ४८८८४५.०० | ४५३४८५.०० | ३५३५९.०० | मंजूर |
| ७. | १०५ नारायण धुरु स्ट्रीट | दुसरा / मंडळ | तळ + ३ / १ + १० = ११ | ३८८.०० / ९९५.३५ | ३८६१९८.०० | २००८३१.०० | २००८३१.०० | ० | मंजूर |
| | **सी १-२ विभाग** | | | | | | | | |
| ८ | ४६ दुसरा भोईवाडा गल्ली | पहिला/सु. / मंडळ | तळ + ५ / १ + ११ = १२ | ६११.५० / ९९०.३९ | ६०५६२५.०० | ६०५६२५.०० | ६०५६२५.०० | | मंजूर |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **सी ३-४ विभाग** | | | | | | | | |
| ९ | ३-५-७ नौरोजी स्ट्रीट , शेठ ब्लॉक | पहिला मंडळ | तळ + ३<br>३८ + ११ = ४९ | १७२७.००<br>२९३.७२ | ५०७२६६.०० | ५०७२६६.०० | ५०७२६६.०० | ० | मंजूर |
| १० | ६१८-बी, भिवंडीवाला टेरेस, जे. एस. एस. रोड | दुसरा मंडळ | तळ + ४<br>१७ + ३ = २० | ८८३.२४<br>९९८.३४ | ८८१७७५.०० | ४९०३१७.०० | ४९०३१७.०० | | मंजूर |
| | **डी-१ विभाग** | | | | | | | | |
| ११ | ३५५ व्ही. पी. रोड | चौथा मंडळ | तळ + ४<br>३१ + १७ = ४९ | २१५८.००<br>९६२.८० | २०७८५१४.०० | १०४९११४.०० | १०४९११४.०० | ० | मंजूर |
| १२ | १६९-१७३ व्ही. पी. रोड | तिसरा मंडळ | तळ + ४<br>४२+ ६ = ४८ | १८५६.००<br>९८९.३० | १८३६१५४.०० | ५५४०७८.०० | ५५४०७८.०० | | मंजूर |
| १३ | ३२-३२-ए, काकडवाडी, | दुसरा मंडळ | तळ + ४+ २<br>१४ + ३ = १७ | ६९८.३३<br>६११.०५ | ४२६७१७.०० | २५६०२७.०० | २५६०२७.०० | | मंजूर |
| १४ | २२९-सी, राजाराम मोहनरॉय मार्ग | तिसरा मंडळ | तळ + ३<br>३५ + १ = ३६ | १५७३.६४<br>१०७४.६४ | १६४९१६७.०० | ५९९१६७.०० | ५२३६४०.०० | | मंजूर |
| १५ | १५, जे. एस. एस. रोड, | चौथा मंडळ | तळ + ३<br>११ + ५ = १६ | ४६२.९२<br>१०१०.३२ | ४६७७०१.०० | १९२४९६.०० | १८७७१५.००/ | | मंजूर |
| १६ | १६-ए, बाबूलनाथ रोड | तिसरा मंडळ | तळ + ३<br>३० + ० = ३० | ११३१.५९<br>८६९.४२ | ९८३८३२.०० | ४३४१३२.०० | ४३४१३२.०० | | मंजूर |
| | **डी-२ विभाग** | | | | | | | | |
| १७ | ३ राघववाडी, बाम्बे व्हिला | चौथा मंडळ | तळ + ६<br>१५ + ० = १५ | ११६३.९८<br>९७१.०८ | ११०७११६.०० | ५४५७२८.०० | ५४५७२८.०० | | मंजूर |
| १८ | ६३ प्राक्टर रोड | दुसरा ना.ह.प्र. | तळ + ३<br>२१ + २ = २३ | २५३२.३४<br>९३२.६२ | २३७६९२३.०० | २०३१७६५.०० | २०३१७६५.०० | | मंजूर |
| १९ | ३५२-ए, एम. एस. अली रोड, बलराम मेन्शन | दुसरा मंडळ | तळ + १<br>१२ + २= १४ | १७८.७३<br>१७१२.६४ | ३०६१०१.०० | २२०७८१.०० | ९३४५०.०० | | मंजूर |
| २० | १९४ खेतवाडी बॅक रोड, तलाटी बिल्डींग | पहिला/सु मंडळ | तळ + ३<br>३४ + ० = ३४ | १५३२.८४<br>९९८.८० | १५६०९७५.०० | १५६०९७५.०० | १५६०९७५.०० | | मंजूर |

## परिशिष्ट ''ब''

## मंडळाच्या दि.७/३/२००३ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजुरी देण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांची यादी

| अ.क्र | विभाग | वर्गवारी | इमारतीचे नांव | दुरुस्ती टप्पा<br>मंडळ/<br>ना.ह.प्र. | मजले<br>भाडेकरु<br>नि+अनि=एकूण | क्षेत्रफळ चौ.मी.<br>--<br>दर चौ.मी.चा खर्च | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम<br>निव्वळ टप्प्याची रक्कम | रु.१०००/-प्रति चौ.मी.मंजुरी करीता प्रस्तावित रक्कम | रु.१०००/- प्रति चौ.मी.जास्त असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
| १. | ई | अ | १९९-जी, म्हातारपाखाडी, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ+ १<br>२ + ० =२ | १५०.०६<br>९६५.३७ | १४४८६२/-<br>७८६९७/- | ७८६९७/- | -- | मंजूर |
| २. | -"- | अ | १९९-एच, म्हातारपाखाडी, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + १<br>२ + ० = २ | १३४.६४<br>९५३.२६ | १२८३४७/-<br>१२८३४७/- | १२८३४७/- | -- | -"- |
| ३. | -"- | अ | ५३, टेमकर स्ट्रीट, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>३ + १ = ४ | २२४.८१<br>९१८.११ | २०६४०१/-<br>१४९९०५/- | १४९९०५/- | -- | -"- |
| ४. | -"- | अ | ६/२४, मोतीशा लेन, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>३६ +१० =४६ | १२८७.४२<br>१०००.०० | ९५७६९५/-<br>६२९५८५/- | ६२९५८५/- | -- | -"- |
| ५. | -"- | -"- | ९६-९८, शेख बु-हाण स्ट्रीट, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>७ + १ = ८ | ३७८.३६<br>१०३८.१८ | ३९२८०५/-<br>३४४६२९/- | ३३०१८४/- | १४४४५/- | -"- |
| ६. | -"- | क | ५८, मोरलॅन्ड रोड, मुंबई | प.टप्पा सुधा.<br>मंडळ | तळ + ३<br>१२+ ० =१२ | १५८४.८१<br>९८४.४५ | १५६०१५८/-<br>१५६०१५८/- | १५६०१५८/- | -- | -"- |
| ७. | -"- | अ | २५-२७, कामाठीपुरा, १४वी गल्ली, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>१५+ ० =१५ | ४५०.८८<br>१०१८.८४ | ४५९३७३/-<br>२३४८४३/- | २२६३५०/- | ८४९३/- | -"- |
| ८. | फ.ग/द | अ | मिनर्व्हा बिल्डींग, माधवदास पास्ता रोड, दादर (पु), मुंबई | चौथा टप्पा<br>ना.ह.प्र. | तळ+ ३<br>३२+ ७ = ३९ | १५३४.००<br>९८२.२० | १५०६७०६/-<br>८६८२२५/- | ८६८२२५/- | -- | -"- |
| ९. | -"- | -"- | ४७-बी, रावळ टेरेस, हॉस्पीटल ॲव्हेन्यु रोड, परळ, मुंबई | दु.टप्पा सुधा<br>मंडळ | तळ+ ३<br>१६+० = १६ | ८०६.४०<br>९८२.३७ | ७९२१८३/-<br>७५६६३२/- | ७५६६३२/- | -- | -"- |
| १०. | फ.ग/उ<br>- | ब | ६१, पारेख चेंबर्स, आर.ए.किडवाई मार्ग, वडाळा, मुंबई | प.टप्पा सुधा.<br>मंडळ | तळ +२+३<br>५ + ३= ८ | ७३५.२२<br>८०४.३० | ५९१३३८/-<br>५९१३३८/- | ५९१३३८/- | -- | -"- |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११. | फ.ग/उ | अ | २३५, रेवा भवन, एल.जे.रोड, माहिम, मुंबई | दु.टप्पा सुधा. मंडळ | तळ + ३<br>९९ + ८=२७ | १३७२.८६<br>१०४५.४८ | १४३५२९२/-<br>१२७२५०८/- | १२७२५०८/- | -- | -"- |
| १२. | -"- | अ | १६-२०, गोपाळ भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई | दु.टप्पा सुधा. मंडळ | तळ + २<br>२८ + २५= ५३ | १५२०.००<br>६४२.३६ | ९७६३८४/-<br>८०७१६६/- | ८०७१६६/- | -- | मंजूर |
| १३. | -"- | अ व क | २४, जमनादास मेन्शन, लक्ष्मी नारायण लेन, माटुंगा, मुंबई | चौ.टप्पा सुधा. मंडळ | तळ + ५<br>५३ + ९= ६२ | २७७६.३७<br>१०००.८३ | २७७८६७६/-<br>२२८६४९६/- | २२७६६९५/- | ९८०१/- | -"- |
| १४. | -"- | अ व क | माहिम मॅन्शन, अे ब्लॉक, एम.एम.सी.रोड, माहिम, मुंबई | चौ.टप्पा सुधा. मंडळ | तळ + २<br>५९ + ९= ६८ | १७०७.०७<br>९९८.५० | १७०४५१६/-<br>९६११९६/- | ९६११९६/- | -- | -"- |
| १५. | -"- | अ व क | माहिम मॅन्शन, बी ब्लॉक, एम.एम.सी.रोड, माहिम, मुंबई | चौ.टप्पा सुधा. मंडळ | तळ + ३<br>९३ + १३= १०६ | २६०६.००<br>९९९.३९ | २६०४४१४/-<br>१५९२४०४/- | १५९२४०४/- | -- | -"- |